N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे    **P.S.(ठाणे):** नरडाणा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0041    **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/03/2025 19:27

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 17/12/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/12/2024

**Time From (वेळेपासून):** 17:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/03/2025    **Time (वेळ):** 19:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 015

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/03/2025 19:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 0.1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नरडाणा ,शिदंखेडा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पंकज नामदेव शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे,नरडाणा ,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे,नरडाणा ,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9823969099

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गजेंद्र पावरा | | | 1. नेम नरडाणा पोलीस स्टेशन, नरडाणा ,धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2,000/ रुपयांची लाचेची मागणी | 2,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी पंकज नामदेव शिंदे वय 43 वर्ष, व्यवसाय नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे.मो.क्र.9823969099.

मी सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्यादी देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे. दि.17/12/2024 रोजी आम्ही कार्यालयात हजर असतांना तक्रारदार किसन कावसिंग पावरा वय 35वर्ष, व्यवसाय शेती, रा.दोदवाडा ता. शिरपुर,जि.धुळे यांनी वरीष्ठांना दुरध्वनी वरून फोन करून सांगितले की, नरडाणा पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार गजु यांचे विरूध्द लाच मागणीची तक्रार आहे. ते नरडाणा गावा जवळ महामाग्रावर भेटणार आहेत.बाबत वरीष्ठांनी कळवल्याने आम्ही सापळा कार्यवाहीसाठी मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, धुळे यांना पत्र देवुन दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणुन कार्यालयात उपलब्ध करून घेतले.
त्यानंतर आम्ही,दोन्ही पंच व पोलीस पथक असे शासकीय वाहनाने ला.प्र.वि.धुळे कार्यालयातून रवाना होवून नरडाणा शिरपुर महामार्गा वर असलेल्या ग्रिन पार्क हॉटेल च्या समोरील रस्त्यालगत कोणाला संशय येणार नाही अशा पध्दतीने थांबलो तेथे तक्रारदार यांची भेट झाली त्यांनी त्यांचे नाव गाव सांगुन त्यांनी पंचासमक्ष तोंडी तक्रार सांगीतली की, शेती व्यवसाय करुन उदरनिर्वाह करतो, माझा चुलत भाऊ जयसिंग मोहन पावरा हा सुमारे 7/8 दिवसापुर्वी आमचे दोंदवाडे गावातुन माझी मोटर सायकल क्र. एम एच.01 सी.जी.1933 घेवुन धुळे येथे जात असतांना मुंबई-आग्रा महामार्गावरील नरडाणा येथील पुलावर मोटारसायकल घसरुन पडल्याने माझे भावास दुखापत झाली होती. तेव्हा तेथे नरडाणा पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी येवुन माझे भावास नरडाणा येथील सरकारी दवाखान्यात उपचाराकरीता दाखल केले होते. त्यानंतर मी माझे भावाकडे असलेल्या मोटारसायकलची नरडाणा पोलीस स्टेशन येथे चौकशी करण्याकरीता गेलो असता तेथे माझी पोलीस हवालदार गजु यांचेशी भेट झाली तेव्हा त्यांनी मला भावाजवळील मोटारसायकल नरडाणा पोलीस स्टेशन येथे जमा असल्याचे सांगितले. तेव्हा मी त्यांना मोटारसायकल देण्याची विंनती केली असता त्यांनी मला, ''तुम्हाला मोटारसायकल परत घेवुन जायची असेल तर मोटारसायकलचे कागदपत्र घेवुन या व मोटारसायकल सोडण्याच्या मोबदल्यात मला 5,000/-रु द्यावे लागतील त्या शिवाय तुला मोटारसायकल परत मिळणार नाही.'' अशी तोंडी हकीगत सांगीतली तक्रारदार यांना लिहता वाचता येत नसल्याने पथकातील अंमलदार यांनी सदरची तक्रार लिहुन घेवुन तक्रारदार किसन पावरा यांना पंचासमक्ष वाचुन दाखविली तोंडी कथन केलेली हकीगत व लेखी हकीगत सारखी असल्याने त्यावर तक्रारदार यांनी सही केली.
त्यानंतर तक्रारदार यांचेशी चर्चा करुन पडताळणी कामी पंच यांना तक्रारदार यांचे मित्र भासवून तक्रारदार यांचे सोबत नरडाणा पोलीस स्टेशन येथे पाठविण्याचे ठरले त्याप्रमाणे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बाजुस अडकवुन दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच हे तक्रारदार यांनी आणलेल्या मोटर सायकल क्र. एम.पी.-46-एम.के. 7409 ने रवाना होवुन काही वेळानंतर तक्रारदार व पंच असे परत आले.तेव्हा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद करून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण एकले असता त्यात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण आम्ही, दोन्ही पंच, तक्रारदार व सापळा पथक असे सर्वांनी एकले ''त्यात तक्रारदार, पोलीस हवालदार गजु यांच्यात तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा होवुन चर्चे दरम्यान पोलीस हवालदार गजु यांनी तक्रारदार यांच्याकडे '' कुछ बी नय लाया, तो कैसे गाडी लेके जायेगा, उस दिन तो बोला था लेके आता बोले तु, तसेच ''एक तो तुम्हारे नाम पे गाडी नय ये, फिर बी गाडी साबको पुछ के देरे,फिर, आपका काम हे ना,करके देने का व ''मुझे लगा तुने लाया होगा, बोला था ना, तुझे दो हजार बोले थे ना ''असे पोलीस हवालदार गजु यांनी बोलुन 2,000/-रुपयांची मागणी करुन आणुन देण्याचे सांगीतले आहे.'' तसेच तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी वरील प्रमाणे हकीगत सांगुन सांगीतले की, मोटारसायकल पोलीस

स्टेशनच्या बाहेरच्या आवारातुन मोटारसायकल तक्रारदार यांना ताब्यात देतांना पंचापासुन काही अंतरावर घेवुन जावुन तक्रारदाराकडे 2,000/- रुपये लाचेची मागणी करुन पैसे कोणाकडे आहे अशी विचारणा केली तेव्हा तक्रारदार यांनी पैसे आणले नसल्याचे सांगीतले तेव्हा पोलीस हवालदार गजु यांनी पैसे नाही आणले तर गाडी कशी घेवुन जाणार असे तक्रारदार यांना बोलुन पोलीस हवालदार गजु यांनी तक्रारदार यांच्यासोबत असलेल्या पंचाना गावची माहीती विचारली तक्रारदार हे मध्ये बोलायला लागलो तर तक्रारदार यांना बोलण्यास नकार देवुन पंचाकडे आधारकार्डची मागणी केली तेव्हा पोलीस हवालदार गजु यांच्यासोबत त्यांचा कार्यालयातील सहकारी हजर होते ते देखील पंचाची चौकशी करत होते. नंतर तक्रारदार व पंच हे मोटारसायकल पोलीस स्टेशनच्या बाहेर घेवुन आले. पोलीस हवालदार गजु हे तक्रारदार यांच्याकडे संशयी नजरेने पाहत होते.वगैरे मजकुरची हकीगत कथन केली तसेच पंच यांनी देखील तक्रारदार प्रमाणे मिळती जुळती हकीगत सांगीतली आहे.पोलीस हवालदार गजु यांना संशय आल्याने सदर पुढील कार्यवाही शक्य नसल्याने तक्रारदार यांना पोलीस हवालदार गजु यांनी संपर्क केल्यानंतर कार्यवाही करणे बाबत ठरले होते.तसचे पोलीस हवालदार गजु यांनी संपर्क न कल्याने व तक्रारदार श्री किसन पावरा यांना संपर्क केला असता त्यांनी सांगीतले की, गजु हा आमच्या पावरा समाजाचा असल्याने मी त्याच्या विरुध्द आता पुढील कारवाइ करु शकत नाही तेव्हा आम्ही त्यांना पोलीस हवालदार यांचे नाव विचारले असता गजु उर्फ गजेंद्र पावरा असे त्यांचे नाव सांगीतले आहे.

एकंदरीत तक्रारदार श्री किसन कावसिंग पावरा यांनी दि.17/12/2024 रोजी दिलेली तक्रार व त्यावरुन झालेली पडताळणी कार्यवाही पो.कॉ. गजु उर्फ गजेंद्र पावरा, नेम. नरडाणा पोलीस स्टेशन यांनी त्यांचे पदाचा दुरुपयोग करुन स्वत:च्या आर्थीक फायदयासाठी तक्रारदार यांच्या कडे मोटारसायकल सोडण्याकरीता 2,000/-रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न होत असल्याने पो.कॉ. गजु उर्फ गजेंद्र पावरा नेम. नरडाणा पोलीस स्टेशन यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NILESH RAMESHSING MORE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
नरडाणा पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** NILESH RAMESHSIN
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोहवा/9224 ईश्वर बळीराम चव्हाण
नेम. नरडाणा पो.स्टे.